खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२२ – २३

### मराठी विभाग - जागतिक महिला दिन : मा. राजमालाताई बुट्टेपाटील

सकाळ

# महिलांनी सुदृढ, स्वावलंबी बनायला हवे

## बुट्टे पाटील यांचे मत; राजगुरू महाविद्यालयात जागर जाणिवांचा अभियान




राजगुरुनगर (ता. खेड) : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात स्त्रियांच्या आत्मसन्मानाची शपथ घेताना संस्था पदाधिकारी व विद्यार्थी.

राजगुरुनगर, ता. १७ : जागतिक महिला दिन हा स्त्रियांच्या आत्मसन्मानाचा उत्सव असून महिलांनी स्वतःचा आवाज न विसरता सुदृढ, सुशिक्षित, सुजाण व स्वावलंबी बनवायला हवे, असे मत राष्ट्रीय मानवाधिकार संघटनेच्या महिला सेल अध्यक्षा ॲड.राजमाला बुट्टे पाटील यांनी केले.

त्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्यावतीने आयोजित जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित जागर जाणिवांचा अभियान कार्यक्रमात बोलत होत्या. यावेळी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, डॉ. रोहिणी राक्षे, हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. बी. दौंडकर आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्यावेळी मराठी विभागाच्यावतीने लिंगभेद संवेदनशीलता, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण, मुलींच्या जन्मदराचे घटतेप्रमाण, उंच माझा झोका इत्यादी विषयांवर प्रबोधन केले.

उपस्थित विद्यार्थ्यांना स्त्री आत्मसन्मानाची शपथ घेतली.अपेक्षा कर्वे व ज्ञानेश्वरी पावडे या विद्यार्थिनींनी स्त्रियांच्या सृजनशीलतेचा जागर केला. क्रीडा विभागाच्या वतीने रस्सीखेच स्पर्धेचे, अर्थशास्त्र विभागाच्यावतीने डॉ. अर्चना आहेर यांच्या व्याख्यानाचे, तर ग्रंथालय विभागाच्यावतीने स्त्रीवादी पुस्तकांच्या प्रदर्शनाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व शपथ वाचन डॉ. संजय शिंदे यांनी केले, तर आभार प्रा. प्रतिमा लोणारी यांनी मानले.

Pune, District-Today1
18/03/2023 Page No. 4

# विद्यार्थिनींनी कर्तृत्व सिद्ध करावे - ॲड. राजमाला बुट्टे पाटील

**राजगुरुनगर :** जागतिक महिला दिन हा स्त्रियांच्या आत्मसन्मानाचा उत्सव असून विद्यार्थिनींनी आपल्यामधील कर्तृत्वाला योग्य संधी देऊन स्वतःला सिद्ध करावे, असे आवाहन राष्ट्रीय मानवाधिकार संघटनेच्या महिला सेल अध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टे पाटील यांनी केले. त्या येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित जागतिक महिला दिनानिमित्तच्या 'जागर जाणिवांचा अभियान' कार्यक्रमात बोलत होत्या. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, डॉ. रोहिणी राक्षे, हिरामण सातकर पाटील, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ.एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा.व्ही.बी.दौंडकर, प्रबंधक कैलास पाचारणे आदी उपस्थित होते. ॲड. बुट्टे पुढे म्हणाल्या की, महिलांनी स्वतःचा आवाज न विसरता सुदृढ, सुशिक्षित, सुजान व स्वावलंबी बनण्याचा प्रयत्न करायला हवा. स्त्री व पुरुषांनी एकमेकांशी तुलना करण्यापेक्षा समानतेचा, आत्मभानाचा जागर करून पुढे वाटचाल केली तर तो खऱ्या अर्थाने माणूसपणाकडे घेऊन जाणारा मार्ग ठरेल असे त्यांनी सांगितले. मराठी विभागाच्या वतीने लिंगभेद संवेदनशीलता, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण, मुलींच्या जन्मदराचे घटते प्रमाण, उंच माझा झोका इत्यादी विषयांवर प्रबोधन करण्यात आले.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**